होण्याचा अधिक संभव आहे. महाड सत्याग्रहाच्या वेळी बाबासाहेब आंबेडकरांनीही हेच धोरण स्वीकारले होते. श्री. वा. न. घोरपडे (नागपूर) यांनी सत्याग्रहातील शपथपत्रिकेबाबत काही सुचन्या केल्या होत्या. त्यात १) जन्मसिद्ध चातुर्वर्ण्यावर माझा विश्वास नाही. २) जातिभेद मला मान्य नाही, ही दोन कलमे होती. आंबेडकरांनी ही दोन्ही कलमे तत्त्वतः बरोबर आहेत अशी ग्वाही दिली, परंतु ती शपथपत्रिकेत घालण्यास नकार दिला. ''सत्याग्रहासारखी चळवळ विशिष्ट बाबींवरच भार ठेवून चालवावयाची असते. तिच्यामध्ये अनेक प्रश्नांची गुंतागुंत होऊ देणे इष्ट नसते आणि व्यवहारामध्ये तत्त्वाचा भंग होऊ न देता वेगवेगळ्या मतांच्या व प्रवृत्तींच्या माणसांशी सहकार्य करणे सर्वांना फायदेशीर असते.''[८३] असे आपले धोरण बाबासाहेबांनी विशद करून सांगितले होते. गांधींनीही अस्पृश्यतानिवारणाच्या जनआंदोलनाची कक्षा 'सार्वजनिक ठिकाणी इतरांच्या बरोबरीने मुक्त प्रवेश' एवढ्यापुरतीच मर्यादित ठेवली याचे मर्मदेखील हेच आहे. आश्रमवासियांच्या आणि हरिजन सेवक संघातील कार्यकर्त्यांच्या बाबतीत अस्पृश्यतानिवारणासंबंधीची त्यांची शिस्त अत्यंत कडक होती. कुणाकडून थोडा जरी शिस्तभंग झाला तरी, मग ती वडील बहीण असो, पत्नी असो किंवा जवळचा सहकारी असो, त्यांची ते बिलकुल गय करीत नसत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



म. गांधी

आंबेडकर गांधी

गंगाधर बाळकृष्ण सरदार

भूमिका

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांचे आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी जे योगदान आहे ते कोणालाही अमान्य होणार नाही. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात राजकीय परिवर्तन व सामाजिक समता याबाबतचे अग्रक्रम ठरविताना या दोघांमध्ये मतभेद होते हे खरे आहे, मात्र लोकशाही व मूल्यांची जोपासना याबाबत त्यांच्या उद्दिष्टात मूलतः सारखेपणा होता या मताचा पुरस्कार करणारे जे पुस्तक महाराष्ट्राचे समतोल विचारवंत व मराठी साहित्य सम्मेलनाध्यक्ष गं. बा. सरदार यांनी लिहून ठेवले त्यातील महत्वाचा भाग येथे कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनासाठी प्रस्तूत करताना आम्हाला आनंद होत आहे.

गं. बा. सरदार लिखित हे संपूर्ण पुस्तक सुगावा प्रकाशन, ५६२ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे उपलब्ध आहे.

ॲड्. अभय छाजेड प्रा. विकास देशपांडे

१४ एप्रिल २०१२
आंबेडकर जयंती

प्रकाशक –
दलित मित्र उत्तमराव भुमकर
कार्यालय सचिव, काँग्रेस भवन, पुणे ५.

मुद्रक –
प्रथमेश एजन्सी
चंदन वि. दिवाकर
३९०/ब–१ दत्तधाम अपार्टमेंट,
नारायण पेठ, पुणे ४११०३०

मूल्यः ₹ १०/-

आंबेडकर आणि गांधी

अस्पृश्यतानिवारण हा गांधींच्या जिव्हाळ्याचा प्रश्न होता याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही. पण मग दलितांच्या विभक्त मतदारसंघाला त्यांनी प्राणपणाने विरोध का केला हे नीट समजून घ्यावयास हवे. त्यांची भूमिका कोणाला पटेल वा न पटेल, पण ती प्रामाणिकपणाची होती, आणि ती निभावून नेण्यासाठी पडेल ती किंमत देण्याची त्यांची तयारी होती हे विसरून चालणार नाही. देशभरच्या दौऱ्यामधून गांधींचा लाखो सर्वसामान्य लोकांशी संबंध येत होता. त्यांत स्पृश्यांप्रमाणे अस्पृश्यही होते. निरनिराळ्या थरांतील लोकांशी प्रत्यक्ष संपर्क राखण्यासाठी ते नेहमीच दक्ष असत. खेड्यापाड्यांतील कष्टकरी अस्पृश्यांची हलाखीची परिस्थिती त्यांनी स्वतः डोळ्यांनी पाहिली होती. ओरिसा व मलबार प्रांतातील त्यांची दैन्यावस्था बघून त्यांचे मन अक्षरशः हादरले होते. दलितांची या दुरवस्थेमधून खऱ्या अर्थाने सुटका कशी करता येईल याचा विचार गांधींच्या मनात सदैव घोळत होता. घटनात्मक तरतुदी, राखीव जागा, विभक्त मतदारसंघ इत्यादिकांचा मूलगामी समाजपरिवर्तनाच्या संदर्भात फारसा उपयोग होणार नाही. त्यासाठी सवर्ण समाजातील सेवाभावी कार्यकर्त्यांनी अस्पृश्य बांधवांत राहून त्यांच्या अडीअडचणी दूर केल्या पाहिजेत, त्यांचा विश्वास

संपादन केला पाहिजे. त्याबरोबरच सवर्ण समाजातील धर्मश्रद्ध लोकांच्या मनात व मतात बदल घडवून आणला पाहिजे. या मार्गानेच अस्पृश्यतेचा प्रश्न यशस्वीपणे सोडवता येईल अशी गांधींची धारणा होती. हिंदु-मुसलमानांचा प्रश्न बहुतांशी राजकीय आहे. अस्पृश्यांच्या प्रश्नाला राजकीय बाजू नाही असे नाही. पण त्यापेक्षा त्याच्या सामाजिक-धार्मिक-नैतिक अंगाकडे अधिक लक्ष पुरवले तर ते फलदायी होईल असे त्यांना वाटत होते. आज अनेक कार्यकर्ते ह्या दिशेने काम करीत आहेत. तसे पाहिले तर स्पृश्य आणि अस्पृश्य समाजात आधीच दुरावा आहे. विभक्त मतदारसंघामुळे त्यात आणखी भर पडेल. कदाचित सध्या चालू असलेल्या कामात खंड पडेल आणि बहुधा अस्पृश्यतानिवारण चळवळीची पीछेहाट होईल अशी गांधींना भीती वाटत होती. विभक्त मतदारसंघ हा सामाजिक एकात्मतेच्या मार्गातील मोठा अडसर आहे अशी त्यांची भावना होती. म्हणून त्यांनी इतक्या हिरिरीने त्याला विरोध केला होता. मुसलमान आणि शीख यांना विभक्त मतदारसंघ आधीच दिले गेले होते. हिंदु-मुसलमानांतील कलह वाढत जाऊन देशाची फाळणी झाली. शीख समाजात अतिरेक्यांचे प्राबल्य होऊन राष्ट्रीय जीवनात अस्थिरता माजवण्याचे प्रयत्न कसे बेगुमानपणे चालू आहेत ते आपण पाहत आहोत. हे सर्व लक्षात घेतले तर गांधींची भीती अनाठायी होती असे म्हणता येणार नाही.

विरोधकांचा दृष्टिकोन सहानुभूतिपूर्वक समजून घेण्याची गांधीजी नेहमीच काळजी घेत असत. दलितांच्या नेत्यांचा संयुक्त मतदारसंघाला असलेला विरोध मी समजू शकतो. माझ्याविषयी त्यांना अविश्वास वाटत असला, तर ते स्वाभाविकच आहे. कारण मी देखील त्यांच्यावर शतकानुशतके अन्याय व जुलूम-जबरदस्ती करणाऱ्या वर्गाचाच प्रतिनिधी आहे ना? तेव्हा त्यांच्याबद्दल माझी काही तक्रार नाही. उलट आपण खुल्या दिलाने आत्मपरीक्षण करण्याची ही वेळ आहे. आतापर्यंत आपण त्यांच्याशी माणुसकीला काळिमा फासणारे वर्तन करून त्यांचा विश्वास गमावला आहे. आपल्या हातून जाणून-बुजून वा अभावितपणे ईश्वर आणि मानवता यांच्याशी द्रोह करण्याचे पातक घडले आहे. त्याचे प्रायश्चित्त घेऊन आणि आपल्या वर्तनक्रमात सुधारणा करून आपण त्यांचा विश्वास पुन्हा संपादन केला पाहिजे अशी त्यांच्या विचाराची दिशा होती. आत्मशुद्धी आणि हृदयपरिवर्तन या दोन्ही गोष्टी साधण्यासाठी उपोषण हा सर्वोत्तम मार्ग आहे अशी गांधींची श्रद्धा होती. म्हणून ह्या प्रसंगीही त्यांनी त्याचा अवलंब केला होता. ''उपोषणाचा निर्णय मी भावनेच्या भरात घेतलेला नाही. विभक्त मतदारसंघाची योजना हिंदू समाजालाच नव्हे तर अस्पृश्य वर्गालाही हानिकारक ठरणार आहे, अशी माझी खात्री आहे. म्हणून या बाबतीत मी एकटा अलग पडलो तरी मी या योजनेला प्राणपणाने विरोध करीन, असे मी गोलमेज परिषदेत ठामपणे सांगितले होते.''[७१]

ह्या उपोषणाचे उद्दिष्ट दुहेरी आहे. सामाजिक एकात्मतेच्या आड येणारी विभक्त

मतदारसंघाची योजना रद्द करून घेणे हा एक भाग. पण दुसरा भाग अधिक महत्त्वाचा आहे. तो म्हणजे ज्यांना अस्पृश्यतानिवारणाची न्याय्यता व निकड पटली आहे अशा लोकांच्या सदसद्विवेकबुद्धीला टोचणी लावून त्यांच्या कर्तव्यभावनेला कार्यप्रवण करणे. "Above all it is intended to sting Hidu conscience into right religious action"[७२] अस्पृश्यतेची रूढी ही पवित्र धर्मभावनेची पायमल्ली करणारी आहे. म्हणून तिचे निर्मूलन करून धर्माचरणाला योग्य वळण लावण्यासाठी हे उपोषण आहे. सनातनी लोकांशी आमचे मतभेद असले तरी त्यांच्यावर आमचा राग नाही. हे उपोषण त्यांच्याविरुद्ध नाही. आमची विचारसरणी प्रामाणिकपणाची आहे, तशी त्यांचीही असू शकेल. मात्र आम्ही यथावकाश त्यांचे मन वळवू शकू असा आम्हाला विश्वास वाटतो. आमची तात्त्विक बैठक जर बरोबर असेल, कार्यपद्धती जर लोकसंवादी असेल तर त्यांच्यावर काहीतरी परिणाम होईलच; आणि ते अंतर्मुख होऊन आपल्या भूमिकेचा फेरविचार करू लागतील अशी आमची अपेक्षा आहे. गांधींच्या उपोषणामागील प्रेरणेचे स्वरूप हे असे होते.

आपल्या चळवळीला पोषक असे चैतन्यमय वातावरण निर्माण करण्यात गांधींचा हातखंडा होता. ते प्राणांतिक उपोषण करणार ही बातमी देशात सर्वत्र पसरली. देशाच्या राजकीय जीवनातील गांधींची प्रतिष्ठा ही अनन्यसाधारण होती. हिंदुस्थानच्या वेगवेगळ्या भागांतून मान्यवर नेते मुंबईस येऊन दाखल झाले. अनेक बाबतीत त्यांचे गांधींशी मतभेद होते. हे लोक वेगवेगळ्या क्षेत्रांतील, वेगवेगळ्या पक्षांचे व प्रवृत्तींचे होते. गांधींची योग्यता आणि प्रसंगाचे गांभीर्य ओळखून या पेचप्रसंगातून मार्ग काढण्यासाठी ते सर्वजण एकत्र आले होते. मुंबईच्या हिंदू परिषदेला उपस्थित असलेल्या लोकांची नावे अशी : सप्रू, जयकर, पुरुषोत्तम ठाकूरदास, चुनीलाल मेहता, कुंझरू, करंजिया, नटराजन्, गो. कृ. देवधर, मनु सुभेदार, बी. एस. कामत, जी. डी. बिर्ला, बी. एफ. भरूचा, हंसा मेहता, अवन्तिकाबाई गोखले, लल्लुभाई सामळदास, मिस नटराजन्, सर गोविंद माडगावकर, डी. जी. दळवी, डॉ. आंबेडकर, एम्. सी. राजा, पी. बाळू, डॉ. सोळंकी, डी. पी. खैतान, डॉ. गिडवानी, लेडी चिमणलाल सेटलवाड, वालचंद हिराचंद, बी. जे. देवरुखकर, सी. राजगोपालाचारी, देवदास गांधी, टी. प्रकाशम्, बाबू राजेंद्रप्रसाद, इ.

२० सप्टेंबर १९३२ रोजी बारा वाजता गांधींचे उपोषण सुरू झाले. मुंबईस हिंदू पुढाऱ्यांच्या परिषदेत सवर्णांच्या आणि दलितांच्या नेत्यांत वाटाघाटी चालू होत्या. जरूर तेव्हा काही नेते पुण्याला जाऊन गांधींशी विचारविनिमय करीत होते. अखेर २४ तारखेला समझोता झाला, तो आपल्या राजकीय इतिहासात 'येरवडा करार' म्हणून प्रसिद्ध आहे. या करारावर दोन्ही बाजूंच्या नेत्यांच्या सह्या झाल्या. मतभेद विकोपाला जाऊ न देता वेळीच एकमताने हा समझोता घडून आला याचे बरेचसे श्रेय महात्मा गांधींना आहे असे खुद्द आंबेडकरांनी म्हटले आहे. दुसऱ्या दिवशी हिंदू परिषदेत जो

ठराव मांडण्यात आला, त्याचा मसुदा गांधींनी तयार केला होता. हा ठराव वाचला, तर गांधींना वस्तुतः काय हवे होते याचा नीट बोध होतो.

"हिंदू समाजात यापुढे जन्मावरून कुणालाही अस्पृश्य मानले जाणार नाही. आतापर्यंत ज्यांना अस्पृश्य समजण्यात येत होते त्यांना सार्वजनिक विहिरी, शाळा, रस्ते आणि अन्य सार्वजनिक संस्था यांचा मुक्तपणे उपयोग करून घेण्याचा बाकीच्या सवर्ण हिंदूएवढाच अधिकार राहील. अनुकूल संधी मिळताच या त्यांच्या अधिकारावर सर्वप्रथम घटनात्मक शिक्कामोर्तब केले जाईल. जर हे आधी घडून आलेले नसेल तर स्वराज्यातील संसदेने ही जबाबदारी लवकरात लवकर पार पाडली पाहिजे. तथाकथित अस्पृश्य वर्गावर रूढीने जे सामाजिक निर्बंध लादलेले असतील ते न्याय्य व शांततामय मार्गाने दूर करणे हे शासनाचे कर्तव्य असेल. दूर करावयाच्या ह्या निर्बंधात अर्थातच मंदिरप्रवेशाच्या निर्बंधाचाही अंतर्भाव होतो"[७३] असा या ठरावाचा भावार्थ आहे.

तुरुंगातून मार्गदर्शन

गांधींचे उपोषण २६ सप्टेंबरला सुटले. त्यानंतर लगेच म्हणजे २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर पर्यंत सर्वत्र अस्पृश्यतानिवारण सप्ताह पाळण्यात आला. सहभोजनाचे कार्यक्रम आयोजित केले गेले. अस्पृश्यांसाठी विहिरी आणि मंदिरे खुली करण्यात आली. गावोगावी जाहीर सभा घेण्यात आल्या. त्यांमधून येरवडा कराराचा आशय विशद करून सांगण्यात आला, त्याबरोबरच लोकांना या संदर्भातील त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यात आली. याच वेळी 'अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संघा'ची स्थापना झाली. त्याच्या प्रांतिक शाखा उघडण्यात आल्या. मुख्य कार्यालय दिल्ली येथे मुक्रर करण्यात आले. संघाचे कार्यवाह म्हणून ठक्करबाप्पांची नियुक्ती केली गेली. याच संघाला पुढे 'हरिजन सेवक संघ' असे नाव प्राप्त झाले. महाराष्ट्रातील निरनिराळ्या पक्षांच्या व प्रवृत्तींच्या लोकांना अस्पृश्यतानिवारणाच्या कार्याबद्दल आस्था होती. म्हणून या संघाच्या कामासाठी येथून गांधींना अनेक समर्पणशील वृत्तीचे कार्यकर्ते मिळाले. येरवडा कराराचा अस्पृश्यांच्या प्रश्नांशी साक्षात संबंध होता. त्यामुळे तुरुंगात असतानाही अस्पृश्यतानिवारणाचे कार्य करता यावे म्हणून सरकारकडून त्यांना काही सवलती मिळाल्या होत्या. आरंभी त्यांनी काही निवेदने प्रसिद्धीसाठी दिली होती. त्यात त्यांनी आपल्या टीकाकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली होती. त्या बरोबर ही चळवळ योग्य दिशेने चालू राहावी म्हणून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले होते.

आपली ही चळवळ शुद्ध धार्मिक स्वरूपाची आहे असे गांधीजी वारंवार आवर्जून सांगत होते. गांधी हे प्रामुख्याने राजकीय नेते होते. शिवाय अस्पृश्यतानिवारण हा काँग्रेस पक्षाच्या कार्यक्रमाचा अधिकृत भाग होता. तेव्हा या चळवळीच्या मुळाशी काहीतरी राजकीय डाव आहे असा गैरसमज होऊ नये, तसेच प्रस्तुत व अप्रस्तुत अशा प्रश्नांची गल्लत होऊन या चळवळीला अकारण फाटे फुट

नयेत म्हणून गांधींना या चळवळीबद्दलची आपली भूमिका पुनःपुन्हा घोषित करण्याची गरज वाटत होती. अस्पृश्यता ही बहुतांशी हिंदू धर्माशी निगडित होती, तरी भारतातील मुसलमान व ख्रिस्ती धर्माच्या लोकांतही हे स्पृश्यास्पृश्यभावनेचे लोण जाऊन पोहोचले आहे. हिंदू धर्मातून या रूढीचे उच्चाटन झाले तर इतर धर्मांतूनही तिचे प्रस्थ आपोआप कमी होईल. ही चळवळ मुसलमानविरोधी किंवा ख्रिस्तीविरोधी नाही. तिच्यात सांप्रदायिकतेचा लवमात्र अंश नाही. उलट तिला मानवी एकत्वाच्या भावनेचे अधिष्ठान आहे. "This is perhaps the biggest religious reform movement in India, if not in the world, involving as it does the well-being of nearly forty million human beings living in serfdom"[७४] जगातील म्हणता आली नाही तरी भारतातील ही सर्वांत मोठी धर्मसुधारणेची चळवळ आहे. कारण आर्थिक व सामाजिक गुलामगिरीत खितपत पडलेल्या सुमारे चार कोटी लोकांच्या भवितव्याशी ती निगडित आहे, असा गांधींच्या ह्या उक्तीचा इत्यर्थ आहे. ज्यांना मी या चळवळीला दिलेले धार्मिक वळण मान्य नसेल त्यांनी तिच्यापासून दूर राहावे, असे त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना बजावले होते.

तुम्ही स्वातंत्र्यसंग्रामाचे सेनानी आहात. तुमचे राजकीय क्षेत्रातील कर्तृत्व वादातीत आहे. लक्षावधी लोकांनी तुमच्या हाकेला ओ देऊन कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला आहे, सरकारच्या दडपशाहीला निर्भयपणे तोंड दिले आहे. तेव्हा स्वराज्यसिद्धीसाठी किंवा राष्ट्रीय ऐक्यासाठी तुम्ही उपोषण केले असते, तर त्याला काही अर्थ होता. पण मंदिरप्रवेशासारख्या दुय्यम प्रश्नासाठी तुम्ही आपले प्राण पणाला लावता, हे बिलकुल समर्थनीय नाही. त्यामुळे मुख्य उद्दिष्टापासून लोकांचे लक्ष विचलित करण्याची फार मोठी चूक तुमच्या हातून घडत आहे, अशा तऱ्हेचा आक्षेप त्यांच्या अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीबाबत अनेकांनी घेतला होता. राजकीय आणि सामाजिक, विधायक आणि संघर्षात्मक अशा दोन्ही आघाड्या समयज्ञतेने व समर्थपणे सांभाळण्यासाठी हवे असलेले सव्यसाचित्व गांधींच्या अंगी होते. त्यांनी आपल्यावरील आक्षेपाला चोख उत्तर दिले आहे. राष्ट्रीय जीवनाचे राजकीय, सामाजिक, आर्थिक असे कप्पेबंद विभाग मी पाडत नाही. माझे अस्पृश्यतानिवारण्याचे कार्य हे राष्ट्रकार्यच आहे. आपली स्वराज्याची चळवळ कुणासाठी आहे? कराचीच्या काँग्रेसमध्ये आपण अधिकृतपणे भावी स्वराज्याचे जे चित्र रेखाटले आहे त्या दिशेने आपला राजकीय-सामाजिक व्यवहार जाणीवपूर्वक पुढे सरकत नसेल, त्यातून हिंदू-मुसलमान, स्पृश्य-अस्पृश्य, श्रमजीवी-बुद्धिजीवी यांची अभेद्य एकजूट होणार नसेल, तर आपल्या स्वातंत्र्यलढ्याला चढते-वाढते बळ कुठून प्राप्त होणार? आपल्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयवादाविषयी पददलित जनतेला आकर्षण तरी कसे वाटणार? अशी गांधींची प्रांजलपणाची कैफियत होती.

अस्पृश्यतानिवारणाच्या संदर्भात दलित बांधवांना अटी घालणे गांधींना मुळीच मान्य नव्हते. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय अशा सर्वच बाबतीत आपण त्यांचा किती किळसवाणा कोंडमारा केला आहे ते गांधींनी आपल्या एका निवेदनात परखडपणे दाखवून दिले आहे. त्यांच्यावर जे घाणेरडे धंदे लादलेले आहेत, त्यातून त्यांची सुटका व्हायला पाहिजे यात शंका नाही. हा प्रश्न मुख्यतः खेड्यातील अस्पृश्यांचा आहे, आणि अजूनही त्या समाजातील बहुसंख्य लोक खेड्यातच आहेत. भंगीकाम, कातडे कमावण्याचे काम आरोग्याला विघातक न होईल अशा रीतीने कसे करता येईल यासंबंधी सुविद्य समाजचिंतकांनी संशोधन केले पाहिजे. तशा आधुनिक कार्यपद्धतीचे प्रात्यक्षिक त्यांच्यासमोर ठेवले पाहिजे. जोपर्यंत त्यांना अधिक चांगला पर्याय उपलब्ध करून दिला जात नाही, तोपर्यंत त्यांनी हे जुने धंदे सोडण्याचा आग्रह धरण्यात काही हशील नाही. जोपर्यंत इतर स्पृश्य समाजाला मिळणाऱ्या सुविधा त्यांना निर्वेधपणे उपभोगता येत नाहीत, तोपर्यंत त्यांना शहाजोगपणे स्वच्छतेचे धडे देणे म्हणजे त्यांच्या जखमांवर मीठ चोळण्यासारखे आहे. म्हणून त्यांच्याशी संपर्क ठेवताना त्यांच्या काही गोष्टी आपल्याला खटकल्या, तरी आपल्या आजपर्यंतच्या अपराधांची शिक्षा समजून आपण त्या सोसल्या पाहिजेत. आपण हे जे काही करतो ते त्यांच्यावर उपकार नाहीत. अगदी अप्रत्यक्षपणेदेखील त्यांच्या मनावर आपल्या ह्या कामाचे दडपण येऊ नये म्हणून आपण सदोदित काळजी घेतली पाहिजे. आपल्या कामातून आपण आश्रयदाते आणि ते आश्रित असे नाते नव्याने अस्तित्वात आले, तर त्यासारखी अन्याय्य व अनर्थकारक दुसरी गोष्ट नाही.

विधायक कार्यात गढून गेलेल्या आपल्या लहानथोर कार्यकर्त्यांना गांधीजी जिवापलीकडे जपत असत. १९३२ साली डिसेंबर महिन्याच्या अगदी सुरुवातीस रत्नागिरीच्या तुरुंगात पायखाने साफ करण्याचे काम करू दिले नाही म्हणून अप्पासाहेब पटवर्धन यांनी उपोषण सुरू केले होते. गांधींना ही बातमी कळताच त्यांना पाठिंबा देण्यासाठी ३ डिसेंबर रोजी त्यांनी स्वतः उपोषण आरंभिले. हिंदुस्थान सरकारने या प्रश्नात लक्ष घातले आणि गांधींना एकदीड दिवसापेक्षा जास्त काळ अन्नत्याग करावा लागला नाही.[७५] सेवाभाव हे अप्पासाहेबांच्या जीवनाचे चैतन्यतत्त्व. जाणूनबुजून उघड्या डोळ्यांनी त्यांनी हे असिधाराव्रत स्वीकारले होते. असे निष्ठावंत कार्यकर्ते हेच आपले खरे बलस्थान आहे याची गांधींना पूर्ण जाणीव होती.

आंबेडकर गोलमेज परिषदेसाठी इंग्लंडला गेले असताना येरवड्याच्या तुरुंगातून प्रसिद्ध झालेली गांधींची पत्रके त्यांच्या वाचनात आली. गांधींच्या विचारात जे बरेचसे परिवर्तन झाल्याचे दिसून आले, त्याचे आंबेडकरांनी निःसंकोचपणे स्वागतच केले होते. ''गांधींना आता 'आपला माणूस' (Our man) म्हणावे; कारण ते आता आपली भाषा व आपले विचार बोलू लागले आहेत.''[७६] सहभोजन व मिश्रविवाह यासंबंधीच्या गांधींच्या मतांतही बदल झाला होता. तरीदेखील अस्पृश्यतानिवारण

आणि सहभोजन व आंतरजातीय विवाह यांची गल्लत करू नये असे ते पुनःपुन्हा निक्षून सांगत होते. याबाबतीत अर्थातच आंबेडकरांचा मतभेद होता.

अप्पासाहेब पटवर्धनांसाठी गांधींनी उपवास केला होता. आंबेडकरांनी जेव्हा हे वृत्त 'डेली हेरल्ड'मध्ये वाचले, तेव्हा त्याबद्दलची त्यांची प्रतिक्रिया खचितच लक्षणीय आहे. ''माझ्या मते या बाबतीत गांधीजींचे करणे अगदी रास्त असून सरकारचे धोरण सर्वस्वी चुकीचे आहे. श्री. पटवर्धनांच्या इच्छेप्रमाणे सरकारने त्यांना भंग्याचे काम करू द्यावयास पाहिजे होते. त्यांना मनाई करण्याचे सरकारला मुळीच कारण नव्हते. जातिभेद व तज्जन्य अस्पृश्यता जर नष्ट व्हावयाची असेल, तर घाणेरडे धंदे वंशपरंपरागत (Hereditary) पद्धतीने करण्याची रूढी नष्टच केली पाहिजे.''[७७] आंबेडकरांच्या या प्रतिपादनावर वेगळे भाष्य करण्याची गरज नाही.

'हरिजन' या साप्ताहिकाचा पहिला अंक ११ फेब्रुवारी १९३३ रोजी प्रसिद्ध झाला. त्या वेळी प्रत्येक अंकाची किंमत फक्त एक आणा होती. सुरुवातीला या पत्रात प्रामुख्याने अस्पृश्यतानिवारणासंबंधाने लेखन येत असे. पुढे गांधींनी जेव्हा राजकारणात लक्ष घातले, तेव्हापासून त्यात इतर विषयही येऊ लागले. याच सुमारास अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संघाचे नाव बदलले आणि त्याला 'हरिजन सेवक संघ' म्हणून संबोधले जाऊ लागले. 'हरिजन' हा शब्द योजण्याची मूळ कल्पना स्वतः गांधींची नव्हती. 'नवजीवन'मधील लेखनात वारंवार येणारा अस्पृश्य हा शब्द अनेक दलित बांधवांना खटकत होता. तसे त्यांनी गांधींना कळवले तेव्हा त्यांनी दुसरा कोणता अन्वर्थक शब्द योजावा यासंबंधी सूचना मागवल्या. एका दलित समाजातील पत्रलेखकाने गुजराथी आद्यकवीच्या गीतातील वचन उद्धृत करून त्यातील हरिजन शब्द वापरावा असे सुचवले. गांधींना ही सूचना पसंत पडली आणि त्यांनी हरिजन हा शब्द योजण्यास सुरुवात केली. हळूहळू तो शब्द बऱ्याच प्रमाणात रूढ झाला. शब्द बदलल्याने वस्तुस्थितीत काही फरक पडत नाही हे खरे आहे. आमच्या अनेक दलित मित्रांना हा शब्द आवडत नाही म्हणून मी त्याचा कमीत कमी वापर करतो. जोपर्यंत सामाजिक जीवनात विषमता आहे, तोपर्यंत संघर्ष अटळच आहे. मात्र हा संघर्ष तत्त्वाच्या किंवा रूढीच्या संदर्भात झाला तरच तो हितावह होईल. पण केवळ शब्दावरून समाजात दोन तट पडणे श्रेयस्कर नाही. काही झाले तरी सवर्ण आणि दलित यांच्यातील संघर्ष हा एकाच देशातील दोन विरोधी प्रवृत्तींमधील संघर्ष आहे. सवर्ण समाजात जसे शोषक आहेत तसे शोषितही आहेत. शोषित सवर्ण आणि दलित यांच्यातील दुरावा नष्ट होऊन केव्हा ना केव्हा त्यांच्यात ऐक्य घडून येणे क्रमप्राप्त आहे. त्याखेरीज अस्पृश्यतेचा प्रश्न सुटणार नाही. समाजपरिवर्तनासाठी असंतोष, चीड, प्रक्षोभ यांची आवश्यकता असते. पण त्यांच्यावरही विवेकाचा, वस्तुनिष्ठतेचा अंकुश ठेवावा लागतो. सध्याच्या अत्यंत गुंतागुंतीच्या परिस्थितीत दलित समाजातील कार्यकर्त्यांवर ही मोठी जबाबदारी आहे.

अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीचा प्रसार अधिक वेगाने, सुजाणपणे, शिस्तशीरपणे व्हावा म्हणून तुरुंगात असताना ८ मे ते २९ मे १९३३ असे एकवीस दिवसांचे उपोषण गांधींनी केले होते. सरकारला त्याची पूर्वकल्पना देताना हा उपवास या चळवळीचा एक भाग आहे, सरकारशी त्याचा काही संबंध नाही असे स्पष्ट केले होते. उपवास सुरू होताच त्यांची मुक्तता झाली. उपवास निर्वेधपणे पार पडला. दोन महिन्यांच्या विश्रांतीनंतर गांधींनी ३१ जुलै १९३३ पासून तेहेतीस आश्रमवासियांसह साबरमती ते रास अशी पदयात्रा काढण्याचे ठरविले आणि तसे सरकारला कळवले. १ ऑगस्टला गांधी, कस्तुरबा, महादेवभाई देसाई आणि तीस आश्रमवासी यांना अटक करण्यात आली. गांधींना साबरमतीहून येरवड्याला हलवले आणि ४ तारखेला त्यांना सोडण्यात आले; पण त्यांच्यावर पुण्याची हद्द न ओलांडण्याचा निर्बंध घालण्यात आला. हा निर्बंध मोडण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केल्यावर त्यांना पुन्हा पकडण्यात आले. त्यांच्यावर खटला भरून त्यांना एक वर्षाची शिक्षा देण्यात आली. हरिजनकार्यासाठी पूर्वी दिलेल्या सवलती पुन्हा चालू कराव्या म्हणून गांधींनी सरकारशी पत्रव्यवहार केला. दोन दिवस त्यांना उपवास करावा लागला, तेव्हा हवी ती सवलत मिळाली. परंतु त्या वेळी त्यांची प्रकृती खालावत चालली होती. ती जास्त ढासळत आहे असे दिसून आल्यावर त्यांना ससून हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. उगाच नसती जोखीम नको म्हणून २३ ऑगस्ट रोजी त्यांची विनाशर्त मुक्तता करण्यात आली. त्यांच्या एका वर्षाच्या शिक्षेची मुदत पुढच्या ३ ऑगस्टला संपत होती. 'तोपर्यंत मी स्वतः कायदेभंग करून कारावास पत्करणार नाही. ह्या काळात मी प्रामुख्याने हरिजनकार्यात जास्तीत जास्त लक्ष घालीन', असे गांधींनी, प्रकृतीला जरा आराम पडताच, जाहीर करून टाकले. त्यांच्या अनेक ज्येष्ठ सहकाऱ्यांना त्यांचा हा निर्णय पसंत पडला नाही. परंतु गांधींनी आपला विचार बदलला नाही. दोन महिन्यांच्या विश्रांतीनंतर त्यांनी या कार्यासाठी जवळपास नऊ महिन्यांचा देशभराचा दौरा केला.

दौऱ्यातील लोकसंपर्क

ह्या दौऱ्याचा प्रारंभ ७ नोव्हेंबर रोजी वर्धा येथून झाला आणि समाप्ती २९ जुलैला बनारस येथे झाली. गांधींचा दौरा हा लोकांची मने जाणून घेऊन त्यांच्या वृत्तीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी होता. निरनिराळ्या प्रांतांतील, निरनिराळ्या थरांतील, वेगवेगळ्या पंथांच्या व वेगवेगळ्या जातींच्या लोकांशी सचेतन संपर्क साधण्याचे देशव्यापी दौरा हे एक प्रभावी माध्यम आहे अशी गांधींची धारणा होती. म्हणून १९२० पासून वेगवेगळ्या कारणांसाठी त्यांनी असे अनेक दौरे आखले होते. "I observe that many who oppose this movement have not taken the trouble to understand its real implications. The object of this tour is to place the position of the reformers clearly

before the public. We want to win them over to the reform by gentlest persuasion, by appealing to their reason and their hearts."[७८] मला असे आढळून आले आहे की या चळवळीच्या विरोधकांनी तिचा वास्तविक आशय जाणून घेण्याची तसदी घेतलेली नाही. लोकांपुढे सुधारकांची भूमिका सुस्पष्टपणे मांडणे हे या दौऱ्याचे खरे प्रयोजन आहे. लोकांच्या बुद्धीला व अंतःकरणाला आवाहन करून अगदी सौम्यतम पद्धतीने त्यांना आम्ही धर्मसुधारणेच्या कार्याकडे वळवू इच्छितो, असा गांधींच्या या उद्‌गाराचा मथितार्थ आहे.

भूकंपग्रस्त बिहारमधील मध्यंतरीच्या वास्तव्याचा एक महिना सोडला तर दौऱ्याच्या उरलेल्या कालावधीत गांधींनी १२,५०० मैलांचा प्रवास केला. ते पहाटे तीन वाजता उठत आणि रात्री दहा वाजता झोपत. नित्याचे कार्यक्रम उरकून ते सकाळी सहा ते रात्री आठ असे चौदा तास प्रवास, गावोगावच्या संस्थांना भेटी, जाहीर सभा, संभाषण यात खर्च करीत होते. पहिल्या चार दिवसांत त्यांना जो अनुभव आला तो कितीतरी उत्साहवर्धक होता. त्यांच्या सभांना दूरदूरच्या खेड्यांतून हजारोंनी लोक येत असत. नुसत्या दर्शनासाठी वाटेत लोक दुतर्फा उभे असत. आपल्या सभेत बहुधा ते विरोधकांना मोकळेपणाने बोलू देत असत. मग अत्यंत आर्जवी स्वरात त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देऊन ते त्यांचे मन वळवू पाहात. ह्या वेळी गांधींच्या वयाला चौसष्ट वर्षे पूर्ण झाली होती. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी आपले शक्तिसर्वस्व पणाला लावले होते. माझ्यासारख्या शेकडो कार्यकर्त्यांचे प्राण खर्ची पडले तरी ते कमीच होतील एवढी मोठी जटिल व निकडीची ही समस्या आहे असे त्यांना वाटत होते. त्यांची जिद्द विलक्षण होती. तरी या दगदगीचा त्यांच्यावर ताण पडतच होता. ते जबलपूरला जाऊन पोहोचले तेव्हा डॉ. अन्सारी यांनी त्यांची प्रकृती तपासली. सतत ताण पडत गेल्याने त्यांचा रक्तदाब वाढला होता. डॉक्टरांनी त्यांच्या बरोबरच्या लोकांना त्यांच्या प्रकृतीची योग्य ती काळजी घेण्याची किती आवश्यकता आहे ते अगदी बजावून सांगितले. 'यापुढे असाच दिनक्रम चालू राहिला, तर त्यांची तब्येत ढासळण्यास वेळ लागणार नाही. हा पूर्वनियोजित नऊ महिन्यांचा दौरा पूर्ण व्हावा अशी तुमची इच्छा असेल तर रोज चार तासांपेक्षा त्यांना जास्त वेळ काम करावे लागणार नाही अशी व्यवस्था करा.' डॉक्टरांच्या या सल्ल्याचा पुष्कळच परिणाम झाला, आणि त्यांना अधिक त्रास होऊ नये म्हणून त्यांचे सहकारी जरूर ती खबरदारी घेऊ लागले.

जनआंदोलन हे स्वभावतःच प्रसरणशील असते. आंदोलन हे नेहमीच आक्रमक असते असे नाही. विधायक कार्याचा व्याप वाढला, त्यात प्रवाहीपणा आला, की त्याला सहजच आंदोलनाचे स्वरूप प्राप्त होते. त्यातून निर्माण झालेल्या स्फूर्तिदायक वातावरणातून नव्या जाणिवा, नव्या मूल्यकल्पना सर्वत्र फैलावतात. गांधींच्या दौऱ्यातून हे घडून येत होते. त्यांच्या वेधशक्तीचा प्रत्यय वारंवार येत होता.

उत्तरोत्तर लोकांची उपस्थिती वाढत होती. गांधींच्या आवाहनाला उत्स्फूर्तपणे मिळणारा लोकांचा प्रतिसाद बघून हरिजन सेवक संघाच्या कार्यकर्त्यांचा आशावाद बळावत होता. हा दौरा म्हणजे जनसामान्यांशी संवाद कसा साधावा याचे मूर्तिमंत प्रात्यक्षिकच होते.

या दौऱ्यात गांधींनी हरिजनकार्यासाठी आठ लाख रुपयांचा निधी गोळा केला होता. तशी ही रक्कम लहानच. पण हजारो गरीब कष्टकरी जनांनी दिलेल्या पै-पैशातून ती जमा झाली होती हे तिचे आगळेपण होते. 'चळवळीसाठी पैसा तर हवाच. पण त्यापेक्षाही मला लोकांची संवेदनशील व संस्कारक्षम मने हवीत. हा पैसा, या भेटी अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीविषयी वाटणाऱ्या आस्थेचे प्रतीक म्हणून मी स्वीकारतो. लोकांना या चळवळीचा आशय उमगला पाहिजे, या प्रश्नाची निकड जाणवली पाहिजे, यासाठी हा माझा सारा आटापिटा आहे. समजा, उद्या कुणा एका धनाढ्य उद्योगपतीने एकदम एक कोटी रुपये दिले, तरी त्यांच्या बळावर मला अस्पृश्यता घालवता येणार नाही. परंतु मला एक कोटी माणसांचा सक्रिय पाठिंबा मिळाला तर, पैसा जवळ नसतानाही, मी अस्पृश्यतेला मूठमाती देऊ शकेन'.

काही लोक गांधींना भेटीदाखल लहानमोठ्या वस्तू देत असत. स्त्रिया कित्येकदा तिथल्या तिथे अंगावरचे दागिने काढून देत असत. ते स्वीकारताना, ह्याच्या जागी पुन्हा नवा दागिना करून घालणार नाही, असे त्यांच्यापासून वचन घेत असत. आपल्या देशातील लाखो स्त्रियांना दिवभर कष्ट उपसूनही पोटभर अन्न मिळत नाही, अंगभर वस्त्रही त्यांच्या वाट्याला येत नाही. अशा स्थितीत सुसंस्कृत स्त्रियांनी सोन्याचे अलंकार घालून मिरवण्यात कसले भूषण, असा त्यांचा रोकडा प्रश्न होता. गांधींना दौऱ्यात भेट म्हणून ज्या वस्तू, जे दागिने मिळत, त्यांचा ते तेथेच लिलाव करत. जी रक्कम हाती येईल ती चळवळीसाठी उभारलेल्या निधीत ते जमा करीत. या लिलावाच्या पद्धतीवर काही लोकांचा आक्षेप होता. लोक देणग्या देतात ते व्यक्तिशः मला खूष करण्यासाठी नाही, तर माझ्या कार्याची आवश्यकता पटते म्हणून ते अशा प्रकारे आपला पाठिंबा व्यक्त करतात. या वस्तू घेऊन जाण्याची व्यवस्था मी करू शकत नाही. शिवाय आश्रमात त्या सर्व साठवून ठेवणे मला प्रशस्त वाटत नाही. प्रत्येक वस्तूचे पैशात रूपांतर करणे हा आजचा युगधर्म आहे. त्यामुळे विनिमय सुकर होतो. देणगीदारांची भावना मी ओळखतो. तिची किंमत कमी लेखण्याचा विचार माझ्या मनाला चुकून देखील कधी शिवणार नाही. मात्र भावनेची परिणती कार्यशक्तीत झाली, तरच कोणत्याही चळवळीचा जोर वाढता राहील. जुन्या शीर्ण हस्तलिखितासाठी विद्याप्रेमी लोक कितीतरी जास्त पैसा खर्च करतात. तेव्हा एखाद्या मोठ्या सामाजिक कार्यासाठी कुणी लिलावात जास्त पैसे दिले तर त्यात काहीच आक्षेपार्ह नाही. शिवाय हा पैसा मी मला आणि इतर सर्वांना श्रेयस्कर वाटणाऱ्या कार्यासाठीच वापरतो.

कौमुदीचा त्याग

कौमुदी ही मलबारमधील एक सोळा वर्षांची मुलगी होती. ती गांधींच्या सभेला गेली होती. त्यांचे भाषण संपताच ती त्यांच्याजवळ गेली आणि आपल्या अंगावरचे सर्वच्या सर्व दागिने तिने त्यांच्या स्वाधीन केले. यासाठी तिने आपल्या वडिलांची अगोदरच परवानगी घेतली होती. आईचा विरोध होणार नाही अशी तिला खात्री वाटत होती. पुन्हा दागिने घालणार नाही असे तिने गांधींना वचन दिले. लग्न झाल्यानंतर नवरा काय म्हणेल, असा त्यांनी तिला प्रश्न विचारला. तेव्हा दागिन्यांच्या बाबतीत जो माझ्याशी सहमत असेल त्याचीच मी पती म्हणून निवड करीन असे तिने ठामपणे सांगितले. गांधींनी तिला स्वाक्षरी दिली आणि त्याबरोबरच, तू देऊन टाकलेल्या अलंकारापेक्षा तुझा त्याग हाच तुझा खरा अलंकार आहे, असा संदेशही दिला. शिवाय 'हरिजन' मध्ये कौमुदीची सामजिक जाणीव आणि त्यागबुद्धी यांवर एक लेख लिहिला. सामान्यांतील असामान्यत्व हा नेहमीच गांधींच्या कौतुकाचा विषय होता. कुठेही त्याची प्रचीती आली की ते त्याची मुक्तकंठाने प्रशंसा करीत.

निदर्शने

गांधींचा दौरा हा लोकांची मने वळविण्यासाठी, अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीला पोषक असे वातावरण निर्माण करण्यासाठी होता. आपला समाज स्थितिशील आहे. आपले लोक गतानुगतिक आहेत. तेव्हा सवर्णांचे मतपरिवर्तन करणे हे काम तसे सोपे नाही याची जाणीव होती. आपल्या मताचे समर्थन करताना त्यांनी चुकून देखील कधी कठोर भाषा वापरली नाही, विरोधकांची मने दुखवली नाहीत. तरी देखील त्यांच्याविरुद्ध सतत निदर्शने होत होती. जागोजाग त्यांना निषेधपर निवेदने दिली जात होती. काही ठिकाणी तर खुद्द गांधींनाच बहिष्कृत मानून त्यांच्याकडे ही निवेदने दुरून फेकली गेली होती. त्यांच्या सभांतून गोंधळ माजविण्याचा वारंवार प्रयत्न होत होता. परंतु नाउमेद न होता ते शांतपणे आपला कार्यक्रम पार पाडीत होते. दौऱ्याच्या शेवटी शेवटी एकदोघे जण गांधींना भेटले आणि त्यांनी त्यांचे छायाचित्र मागितले. मी जवळ आपले छायाचित्र ठेवत नाही असे गांधींनी त्यांना सांगितले. तेव्हा कुठून तरी त्यांनी त्यांची प्रतिमा मिळवली आणि जाहीर सभेत तिचे दहन केले. त्याआधी पुण्याला नगरपालिकेच्या वतीने होणाऱ्या सत्कारासाठी जात असताना वाटेत गांधींच्या मोटारीवर तर बॉम्बच टाकण्यात आला. चुकून तो मागून येणाऱ्या मोटारीवर पडला आणि गांधी बचावले. मात्र दुसऱ्या मोटारीतील काही लोक जखमी झाले. त्यानंतर गांधी म्हणाले, मी हौतात्म्यासाठी हपापलेला नाही. पण हे कार्य करीत असताना जर मला मृत्यू आला तर अस्पृश्यतानिवारणाची चळवळ बंद पडण्याऐवजी तिला अधिक जोर चढेल याबद्दल मला तिळमात्र शंका नाही.

गांधींच्या विचारातील परिवर्तन

गांधींची जीवनसरणी विकसनशील होती. सत्य आणि अहिंसा ही दोन मूलभूत तत्त्वे त्यांनी जन्मभर घट्ट धरून ठेवली होती. बाकी सर्व बाबतीत कालमानानुसार यथोचित बदल करण्याची त्यांची तयारी होती. पूर्वी ते जातिसंस्थेचे समर्थक होते. हिंदुस्थानात आल्यावर इथल्या विशिष्ट परिस्थितीमधून गुंतागुंतीचे प्रश्न सोडवताना त्यांना जे प्रत्यक्ष अनुभव आले, त्यांतून जातिसंस्थेची हानिकारकता त्यांना पटली. अस्पृश्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा करताना त्यांनी जे विचार व्यक्त केले, ते प्यारेलाल यांनी नमूद केले आहेत. "Classless and casteless society was his ideal. When untouchability was really gone, there would be no caste. All would be Hindus, pure and simple."[७९] वर्गविहीन व जातीविहीन समाज हे त्यांचे अंतिम साध्य होते. अस्पृश्यता समूळ नष्ट झाली, तर जात उरणारच नाही. सर्वजण स्वतःला निखळ हिंदू म्हणवून घेतील असे गांधींना वाटत होते.

गांधी शाकाहारी होते. स्वच्छतेचे नियम पाळले गेल्यास कुणाहीबरोबर जेवण्यास त्यांची ना नव्हती. त्यांच्या आश्रमात तर स्पृश्य, अस्पृश्य, मुसलमान, ख्रिस्ती सर्वजण कुठलाही भेदभाव न करता बरोबर जेवत असत. विवाहाच्या बाबतीतही त्यांच्या मतांत पुष्कळ फरक पडला होता. सन १९३३ मध्ये त्यांचा मुलगा देवदास आणि राजगोपालाचारी यांची मुलगी लक्ष्मी यांचा विवाह झाला. हा आंतरजातीय विवाह होता आणि वधूवरांना गांधींनी आशीर्वाद दिला होता. पुढे १९४४ मध्ये तुरुंगातून सुटून आल्यावर हरिजन सेवक संघाच्या बैठकीत कार्यकर्त्यांना मुलगा असल्यास त्याचे हरिजन मुलीशी किंवा मुलगी असल्यास तिचे हरिजन मुलाशी लग्न लावून देण्याची गांधींनी शिफारस केली होती. त्याप्रसंगी मी तुम्हाला अभिनंदनाची तार पाठवीन असेही त्यांनी म्हटले होते. मात्र विवाह ही ज्याची त्याची व्यक्तिगत बाब आहे, त्यात सक्ती होता कामा नये, असे त्यांनी वारंवार आवर्जून सांगितले होते. त्यानंतर लवकरच आपल्या आश्रमात ब्राह्मण समाजातील एका नास्तिक प्राध्यापकाची मुलगी आणि भंगी जातीतील त्यांचा एक नास्तिक शिष्य यांचे लग्न लावून देण्याचा निर्णय झाला होता. त्याच वेळी, वधूवरांपैकी एक हरिजन असल्याखेरीज त्या विवाहाला माझा आशीर्वाद मिळणार नाही असेही त्यांनी जाहीर केले होते.[८०]

आंतरजातीय विवाहाला त्यांची मान्यता होती. त्याप्रमाणेच आंतरधर्मीय विवाहाचे स्वागत करण्याची त्यांची तयारी होती. मात्र धर्म ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब असल्याने वधूवरांनी आपआपल्या धर्माला जन्मभर चिकटून राहावे असे त्यांचे मत होते. विवाहविधी कोणत्याही एका बाजूच्या पुरोहिताने पार पाडावा असे त्यांचे म्हणणे होते.

गांधींनी धर्मश्रद्धा, आत्मशुद्धी, आत्मबळ, वर्णव्यवस्था, रामराज्य इत्यादी जुने

रूढ शब्द वारंवार वापरले असले, तरी त्यांत त्यांनी स्वतःचा खास नवा आशय ओतण्याचा प्रयत्न केला आहे. वैदिक परंपरेतील वर्णसंस्थेचा त्यांनी निःशंकपणे उदोउदो केला आहे. पण त्यांची वर्णव्यवस्थेची कल्पना आणि परंपरावादी लोकांची कल्पना या अगदी भिन्न आहेत. मूळची वर्णव्यवस्था हा केवळ वर्णविभाग आहे.त्यात उच्चनीचभाव नव्हता. निष्ठेने केलेले कोणत्याही वर्णाचे काम हे सारखेच पवित्र व श्रेष्ठ गणले जात होते. निरनिराळे व्यवसाय करणाऱ्या लोकांच्या उत्पन्नात फारशी तफावत नव्हती. म्हणून वर्णविभाग आणि वर्णाभिमान आणि वर्णवर्चस्व या गोष्टीत खूप फरक आहे. अन्नोदकव्यवहार आणि विवाहविधी यासंबंधीच्या सध्या प्रचलित असलेल्या निर्बंधाचा प्राचीन वर्णव्यवस्थेशी काही संबंध नाही, इतकेच नव्हे, तर आंतरवर्णीय व आंतरधर्मीय विवाह हे वर्णसंस्थेच्या तत्त्वाशी मुळीच विसंगत नाहीत अशी गांधींची विचारसरणी होती. विशेषाधिकार आणि मक्तेदारी यांना त्यांचा सक्त विरोध होता.[८१] सर्वांना संस्कृत शिकण्याची व वेदाध्ययनाची मोकळीक असली पाहिजे असे त्यांचे मत होते. जाती व वर्ण यांविषयीच्या त्यांच्या विचारांत उत्तरोत्तर बदल होत गेला आहे. 'गांधीप्रणीत सामाजिक जीवनदर्शनाचे चित्रण ही प्राचीन भारतातील वर्णाश्रमप्रधान जीवनसरणीची सुधारलेली आधुनिक आवृत्ती आहे.'[८२] प्यारेलाल यांचा हा निष्कर्ष पुष्कळांना धक्कादायक वाटेल. गांधीजी अनेकदा पारंपरिक परिभाषा वापरतात. त्यामुळे त्यांच्या विचारप्रणालीतील प्रगमनशील आशय अलक्षित राहतो. यात लोकांची काहीच चूक नाही. कारण नव्या आशयाची अभिव्यक्ती नव्या परिभाषेत झाली तरच तिचा योग्य तो परिणाम होण्याचा अधिक संभव असतो. गांधींचा खरा विरोध औद्योगिक युगातील स्वयंकेंद्रितता, निर्घृण स्पर्धा, आर्थिक विषमता आणि भोगवाद यांना होता. म्हणून त्यांनी वर्णाश्रमधर्मातील आनुवंशिक व्यवसाय व अंतर्मुख वृत्ती यांना उचलून धरले. जुनी वर्णव्यवस्था कितीही चांगली असली तरी सद्यःस्थितीत ती पुन्हा प्रचारात येणे शक्य नाही, हे त्यांनी ओळखले होते. आज तरी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या अर्थशून्य, आशयहीन शब्दखुणाच बनल्या आहेत. म्हणून हिंदू समाजातील सर्वांनी स्वतःला शूद्र म्हणवून घ्यावे असे त्यांनी निःसंदिग्धपणे सुचवले होते. आनुवंशिक व्यवसायाचे तत्त्व आता कुणी निरपवादपणे स्वीकारणार नाही याची त्यांना कल्पना होती. गांधींचे सर्व विचार जसेच्या तसे ग्रहण करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. वस्तुनिष्ठ दृष्टीने त्यांचे यथातथ्य आकलन करण्याची आपण कोशीस करावयास हवी. आपल्या समोरच्या चळवळीचे धोरण अर्थातच मागचापुढचा विचार करून आपण स्वतंत्रपणे आखले पाहिजे.

सार्वजनिक ठिकाणी किंवा सार्वजनिक समारंभात स्पृश्यास्पृश्यभेद पाळला जाऊ नये असा नियम करणे खचितच योग्य; पण सहभोजन, मिश्रविवाह या बाबतींत कुणावरही सक्ती करणे न्याय्य ठरणार नाही. म्हणून अस्पृश्यतानिवारणाची चळवळ आणि सहभोजन, आंतरजातीय विवाह यांची गल्लत केल्यास चळवळीची हानी